# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक-06.09.2026 वार- रविवार

**धायरी भूसंपादन**

पुण्यातील धायरी परिसरातील लोकमत प्रेस ते सावित्री गार्डन या प्रस्तावित तीस मीटर रुंद रस्त्याच्या भूसंपादनासाठी साठ कोटी रुपयांच्या तरतुदीला मान्यता देण्यात आली आहे. एक किलोमीटर लांबीच्या या रस्त्यामुळे ६१ मिळकती बाधित होणार असून त्यापैकी ५ मिळकती पालिकेने ताब्यात घेतल्या आहेत.उर्वरीत छप्पन मिळकतींचे क्षेत्र भूसंपादन कायद्यानुसार ताब्यात घेतले जाणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**गाळप हंगाम निर्देश**

गाळप हंगामात ऊस वाहतूक कऱणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा झोका वाढत असल्याने, खबरदारीचे उपाय म्हणून या वाहनांसाठी साखर आयुक्तालयानं निर्देश जारी केले आहे. या वाहनांना रिफ्लेक्टर बोर्ड आणि रिफ्लेक्टर टेप लावणे बंधनकारक कऱण्यात आलं असून, या संदर्भात साखर आयुक्त डॉक्टर संजय कोलते यांनी राज्यातील सहकारी आणि खासगी कारखान्यांना निर्देश दिले आहेत.

**गणेशोत्सव रेल्वे**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने पुणे- रत्नागिरी दरम्यान सहा विशेष रेल्वे फेऱ्या जाहीर केल्या आहे. मागणीनुसार रेल्वे या अंतर्गत या गाड्या धावणार असून, १२ ते २६ सप्टेंबर या कालावधीत प्रवाशांना सेवेचा लाभ घेता येणार आहे. या विशेष गाड्यांना चिंचवड, तळेगाव, लोणावळा, कल्याण, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, करंजाडी, खेड, चिपळूण, सावरडा, अरवली रोड आणि संगमेश्वर रोड इथं थांबे असतील. विशेष गाड्यांचे आरक्षण, विशेष शुल्कासह तिकीट केंद्रं तसंच ऑनलाइन पद्धतीने सुरू झाल्याचं पुणे रेल्वे विभागाकडून कळवण्यात आलं आहे.

**दशावतार**

कोकणातल्या आठशे वर्षांची परंपरा असणारे दशावतार लोकनाट्य काल पुणेकरांना प्रथमच अनुभवायला मिळाले. राष्ट्रप्रथम आणि आनंदनाथ या दोन ट्रस्टच्या वतीनं पुणे दहीहंडी महोत्सवात दशावताराचं सादरीकरण आयोजित करण्यात आलं होतं. पौराणिक कथानक, पारंपरिक वेशभूषा, प्रभावी संवाद यातून कलाकारांनी उपस्थितांची मने जिंकली.

**प्रभाअत्रे पुरस्कार**

स्वरयोगिनी डॉक्टर प्रभा अत्रे संगीत साहित्य पुरस्कार आणि संगीत संशोधन पुरस्कारांचे वितरण आज सकाळी सुप्रसिद्ध ध्रुपद गायक, संशोधक, डॉ. ऋत्विक सन्याल यांच्या हस्ते करण्यात आलं. संगीत साहित्याचे पुरस्कार अनुक्रमे प्राध्यापक अंजली मालकर, माधवी नानल, शमा भाटे आणि संगीत संशोधन पुरस्कार अनुक्रमे डॉक्टर अर्पिता वैशंपायन, डॉक्टर पल्लवी पोटे आणि डॉक्टर नीरजा वाघ यांना प्रदान करण्यात आलं.

**आव्हाड पुरस्कार**

आडकर फाउंडेशनच्या वतीनं ज्येष्ठ संत साहित्य अभ्यासक डॉक्टर सदानंद मोरे यांना ॲड़व्होकेट भास्करराव आव्हाड स्मृती पुरस्काराने गौरवण्यात आलं.

आधुनिकतेकडे पाहण्याची स्वतंत्र दृष्टी आव्हाड यांच्याकडं असल्याचं प्रतिपादन मोरे यांनी सत्काराला उत्तर देताना केले.

**मुंदडा पुरस्कार**

महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांना राजस्थान भूषण पुरस्कार समितीचा' राजस्थान भूषण पुरस्कार' जाहीर झाला आहे. गोसेवा आणि समाजसेवेच्या क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात येतो.

**एमपीएससी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील कथित गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे. पुण्यात वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. या संदर्भातील मागण्यांसाठी उद्या ओंकारेश्वर मंदिरापासून जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**पिंचिं धन्वंतरी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सभागृहातील स्वीकृत सदस्यांसह 138 नगरसेवक आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी 'धन्वंतरी गाॅल्ड' योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत पिंपरी आणि पुण्यातील ६० कराराबद्ध रुग्णालयात संवर्ग एकनुसार वैद्यकीय उपचार मिळणार आहे. यासाठी नगरसेवकांना दरमहा पंधराशे रुपये हिस्सा द्यावा लागणार आहे. कुटुंबियांसाठी वार्षिक २० लाख रुपयांची वैद्यकीय तरतूद करण्यात येणार आहे.

**चिंचवडवीज उपकेंद्र**

चिंचवड इथल्या महापारेषण कंपनीच्या अतिउच्चदाब वीज उपकेंद्रात आज दुपारी तांत्रिक बिघाडामुळे आग लागली होती.त्यामुळे या अंतर्गत परिसरातील वीजपुरवठ्यावर मोठा परिणाम झाला होता. आग नियंत्रणात आल्यानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न महावितरणकडून सुरू होते.

**गणेशोत्सव तयारी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाने स्वच्छता, निर्माल्य संकलन आणि गणेशमूर्ती विसर्जनाचे काटेकोर नियोजन केले आहे. पालिका उपायुक्त डॉक्टर प्रदीप ठेंगल यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत या संदर्भात निर्देश देण्यात आले.

**बनावट आरक्षण**

बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे ६० जणांनी खेळाडू आरक्षणातून शासकीय नोकऱ्या मिळवल्याचा प्रकार पुणे पोलिसांनी उघडकीस आणला आहे. या प्रकरणी कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नागर आणि सचिव शिवाजी साळुंखे यांना गुन्हे शाखेने अटक केली आहे. न्यायालयाने आठ सप्टेंबर पोलिस कोठडी सुनावली आहे.

**हवामान**

पुण्यात आज सकाळपासून आकाश अंशतः ढगाळ होतं, अधून मधून पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. शहरात कमाल तापमान २९ अंश तर किमान २१ पूर्णांक ४ दशांश अंश नोंदवलं गेलं. उद्याही हवामानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**